PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Kutumb
Year: 2012

Song: Maatit Janmale Veer
Lyricist:

मातीत जन्मले वीर
ही शिवबाची जहागीर
हो हो...
मातीत जन्मले वीर
ही शिवबाची जहागीर
ज्ञानोबा तुका माऊली
साधूसंत आणि फकिर
ज्ञानदान रोज मागतो
या शारदेला
जीवप्राण रोज सांडतो
स्वातंत्र्यतेला
ज्ञानदान रोज मागतो
या शारदेला
जीवप्राण रोज सांडतो
स्वातंत्र्यतेला
साहित्य नाट्य संगीत कला अन्
माणूसकी मोठी
हां...
आता पाऊले छोटी-छोटी
स्वप्न घेऊनी मोठी-मोठी
पेटून उठली जिद्द घेऊनी

लढतील रण हे माये पोटी
करूनी जीवाचे रान
देऊनी जान वाढवू शान
मराठ्याची
हो...
भरू मनीचा घाव
जगाला दाव तरू दे नाव
कुटुंबाची
चालले वीर घेऊनी शीर
घेऊनी शीर चालले वीर
अडवू कुणी नका
इरादा पक्का
तो दे दे देऊन टाक
पुन्हा धक्का
दे दे दे पुन्हा धक्का
हे दे दे दे पुन्हा धक्का
मंगल देशा पवित्र देशा
महाराष्ट्र देशा
प्रणाम घ्यावा माझा देशी
महाराष्ट्र देशा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*